## अधिसूचना

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
तिसरा मजला, मुख्य इमारत
मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक - १९ जानेवारी, २०१६

दूरध्वनी क्र. २२८८३४१४

महाराष्ट्र वीज शुल्क अधिनियम, १९५८

क्र. इएलडी २०१५/प्र.क्र.१४७/ऊर्जा-१ — ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. इएलडी-२०१५/प्र.क्र.२१/ऊर्जा-१, दिनांक १३ एप्रिल, २०१५ अन्वये, महाराष्ट्र वीज शुल्क अधिनियम (१९५८ चा ४०) (यात या पुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम ३ उपकलम (१) व अधिनियमातील अनुसूचीतील भाग अ, ब, क, फ आणि ग नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून नमूद अधिसूचनेत जोडलेल्या तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये उल्लेख केलेल्या घटकांनी वापरलेल्या ऊर्जेवर तक्त्यातील स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दराप्रमाणे विद्युत शुल्क आकारण्यात आले आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. आयटीपी- २०१३/(प्र.क्र.२६५)/उद्योग-२, दि. २५ ऑगस्ट, २०१५ अन्वये महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण - २०१५ जाहिर केले आहे (यात यापुढे जिचा उल्लेख "योजना" असा करण्यात आला आहे) आणि सदर योजनेत, उद्योग संचालनालयाकडे नोंदणीकृत झालेल्या नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना, उत्पादनाची किंवा कामकाजाची सुरुवात केल्याच्या दिनांकापासून अ व ब क्षेत्रातील खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यान,(माहिती तंत्रज्ञान हार्डवेअर आणि दूरसंचार हार्डवेअर उत्पादन घटकांसह) आणि राज्यातील इतर भागासाठी प्रचलित सामूहिक प्रोत्साहन योजनेतील क्षेत्राच्या वर्गीकरणानुसार घटकांनी उत्पादनाची किंवा कामकाजाची सुरुवात केल्याच्या दिनांकापासून तसेच माहिती तंत्रज्ञान कंपन्यांनी त्यांच्या स्वत:च्या वापरासाठी उभारलेल्या एकाकी घटक माहिती तंत्रज्ञान उद्यानांना (सिंगल युनिट पार्क्स) पूरक सेवा वगळून व माहिती तंत्रज्ञान विशेष आर्थिक क्षेत्रामधील नवीन माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटक, विशेष आर्थिक क्षेत्रामधील माहिती तंत्रज्ञान उद्यानातील नवीन माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटक आणि विशेष आर्थिक क्षेत्रातील एसटीपीआय किंवा अन्य सक्षम प्राधिकरणांना अंतर्गत नोंदणीकृत १०० टक्के निर्यातप्रधान माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवाघटकांना आणि राज्यात कुठेही उभारली गेलेली माहिती केंद्र (यात यापुढे याचा उल्लेख "नमूद घटक" असा करण्यात आला आहे) यांना विद्युत शुल्क भरण्यापासून सूट देण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने सार्वजनिक हितासाठी उक्त घटकांनी वापरलेल्या ऊर्जेवरील उक्त अधिनियमाच्या अनुसूचीच्या भाग फ अन्वये देय असलेले संपूर्ण वीज शुल्क भरण्यातून सूट देणे इष्ट आहे ;

आता, त्याअर्थी, महाराष्ट्र वीज शुल्क अधिनियम, १९५८ (१९५८ चा ४०) याच्या कलम ५ क अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे सोबत जोडलेल्या तक्तातील स्तंभ २ मध्ये उल्लेख केलेल्या घटकांकडून वापरलेल्या वीजेवर तक्त्यातील स्तंभ ३ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीसाठी, उक्त अधिनियमाच्या अनुसूचीच्या भाग फ अन्वये देय असलेले संपूर्ण विद्युत शुल्क भरण्यातून पूर्णत: सूट देण्यात येत आहे.

तक्ता

| अ. क्र. (१) | घटक (२) | कालावधी (३) |
|---|---|---|
| १ | उद्योग संचालनालयाकडे नोंदणीकृत झालेल्या नवीन माहिती तंत्रज्ञान किंवा माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना घटक उत्पादनात गेल्याचा दिनांक किंवा ॲक्टीव्हीटी सुरू केल्याच्या दिनांका दिवशी प्रचलित सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत वर्गीकृत करण्यात आलेल्या अ व ब क्षेत्रातील खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यान, सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान उद्यान (माहिती तंत्रज्ञान हार्डवेअर आणि दूरसंचार हार्डवेअर उत्पादन घटकांसह) आणि माहिती तंत्रज्ञान कंपनीकडून त्यांच्या स्वत:च्या वापरासाठी विकसित केलेल्या एकाकी घटक माहिती तंत्रज्ञान उद्यान; त्यामधील पूरक सेवा वगळून; | १० वर्षे |
| २ | वरील अनु.क्र. १ मध्ये नमूद केलेल्या प्रवर्गात मोडणाऱ्या जे क्षेत्र निर्दीष्ट करण्यात आले आहेत, ते क्षेत्र वगळता, उक्त धोरणाखाली, राज्यात स्थापित करण्यात येणाऱ्या नवीन माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटक | १५ वर्षे |
| ३ | माहिती तंत्रज्ञान विशेष आर्थिक क्षेत्र व विशेष आर्थिक क्षेत्रामधील माहिती तंत्रज्ञान उद्यानातील नवीन माहिती तंत्रज्ञान/ माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटक व डेटा सेंटर्स आणि विशेष आर्थिक क्षेत्रातील एसटीपीआय अथवा अन्य विविक्षित सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणीकृत १०० टक्के निर्यातक्षम माहिती/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटक | कायमस्वरुपी सूट |
| ४ | उद्योग संचालनालयाकडे नोंदणीकृत झालेल्या नवीन डेटा सेंटर्स घटकांना घटक उत्पादनात गेल्याचा दिनांक / उत्पादन व ॲक्टीव्हीटी सुरू केल्याच्या दिनांक दिवशी प्रचलित सामूहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत वर्गीकृत करण्यात आलेल्या राज्यातील अ व ब क्षेत्रात माहिती तंत्रज्ञान उद्यानात व उद्यानाबाहेर स्थापित होणारे खाजगी माहिती उद्यानात व उद्यानाबाहेर स्थापित होणारे खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानातील घटक, महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०१५ मधील परिच्छेद ५ E अन्वये परिभाषित केलेले, आणि शासन निर्णय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ मधील परिच्छेद क्र. ३.४(ब) मधील तरतुदीनुसार राज्यात कोठेही स्थापित होणारे नवीन डेटा सेंटर्स. | १० वर्षे |
| ५ | वरील अनु क्र. ३ व ४ मध्ये जे क्षेत्र निर्दीष्ट करण्यात आले असतील ते क्षेत्र वगळता उक्त धोरणाखाली, राज्यात स्थित असलेले महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण, २०१५ परिच्छेद ५ E अन्वये परिभाषित केलेले, आणि शासन निर्णय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ मधील परिच्छेद क्र. ३.४ (ब) मधील तरतुदीनुसार, राज्यात कोठेही स्थापित होणारे नवीन डेटा सेंटर्स. | १५ वर्षे |

टीप : १) उपरोक्त तक्याप्रमाणे सूट मिळण्यास उक्त स्तंभ (२) मध्ये विनिर्दीष्ट केल्याप्रमाणे जेव्हा युनिट उत्पादन देण्यास किंवा सेवा पुरविण्यास सुरुवात करील त्या दिनांकापासून सुरुवात होईल.

२) माहिती तंत्रज्ञान कंपनीने स्वत:च्या वापरासाठी विकसित केलेली माहिती तंत्रज्ञान उद्याने म्हणजे एकाकी घटक पार्कस हे त्यांच्या स्थानानुसार वरील कालावधीसाठी विद्युत शुल्क माफीस पात्र असतील.

३) या अधिसूचनेत नमूद घटकांनी उद्योग संचालनालय किंवा सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कस ऑफ इंडिया (STPI) किंवा सक्षम प्राधिकरण यांच्याकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच विद्युत शुल्क माफी/सवलत लागू होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(भि.य.मंता)
शासनाचे उप सचिव

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नेताजी सुभाष पथ, मुंबई - ४०० ००४ यांना विनंती करण्यात येते की, सदर अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्रात प्रसिध्द करून त्यांच्या १०० प्रती त्वरीत या विभागास पाठविण्यात याव्यात.

(भि.य.मंता)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१) प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
२) मुख्य विद्युत निरिक्षक, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, ३रा मजला, प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पूर्व), मुंबई-७१
३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि. प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई -५१
४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. प्रकाशगंगा, वांद्रे (पूर्व), मुंबई -५१
५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई -५१
६) महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, मुंबई -५१
७) उद्योग सहसंचालक (माहिती तंत्रज्ञान), महाराष्ट्र राज्य उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई,
८) संचालक, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क्स ऑफ इंडिया, मुंबई / पुणे,
९) अध्यक्ष, द टाटा पॉवर कंपनी लिमिटेड, बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रिट, मुंबई -५१
१०) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, रिलायन्स इंफ्रास्ट्रक्चर लि. रिलायन्स एनर्जी सेंटर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई -५५
११) महालेखाकार(लेखा व अनुज्ञेयता)-१/२,महाराष्ट्र सी.जी. ओ. १०१ महर्षि कर्वे मार्ग, मुंबई -२०
१२) महालेखाकार (लेखा परीक्षा)-१ / २, महाराष्ट्र राज्य,सिव्हील लाईन्स, नागपूर
१३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४)निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१३) निवड नस्ती :- ऊर्जा -१

## NOTIFICATION

Industries, Energy and Labour Department,
Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai – 400 032.
Dated: 19th January, 2016

Maharashtra Electricity Duty Act, 1958

No. ELD-2015/CR-147/NRG-1 – Whereas, by the Government Notification, Industries, Energy and Labour Department, No. ELD 2015/CR-21/NRG-1, dated the 13th April, 2015 issued in exercise of the powers conferred by sub-section (1) of section 3 read with PARTS A, B, C, F and G of the Schedule appended to the Maharashtra Electricity Duty Act (XL of 1958) (hereinafter referred to as "the said Act"),the Government of Maharashtra has levied the electricity duty in respect of the consumption of energy to the premises falling under PARTS mentioned in column (2) of the Table appended to said notification, at the rates mentioned against each of the PART, in column (3) of the said Table;

Whereas, the Government of Maharashtra has, vide Government Resolution, Industries, Energy and Labour Department, No. ITP-2013/(C.R.-265)/Ind-2, dated the 25th August, 2015, declared the Maharashtra's Information Technology or Information Technology Enabled Services Policy (IT or ITES)-2015 (hereinafter referred to as the "said Policy") and under the said Policy, exemption is given from the payment of electricity duty in respect of the consumption of the energy by New Information Technology or Information Technology Enabled Services (IT or ITES) units registered with the Directorate of Industries from the date of commencement of production or activity for units in private Information Technology (IT) parks (including Information Technology (IT) hardware and Telecom hardware manufacturing units), in A and B areas and in other areas of the State classified as per the prevailing Package Scheme of Incentives from the date of commencement of production or activity of the units and for Information Technology (IT) parks developed by Information Technology (IT) companies for their own use, i.e. single unit parks except for the support services; and also for the New Information Technology or Information Technology Enabled Services (IT or ITES) units in Information Technology Special Economic Zones (IT SEZs), new Information Technology or Information Technology Enabled Services (IT or ITES) units in Information Technology (IT) parks in Special Economic Zones (SEZs), and 100% exporting Information Technology or Information Technology Enabled Services (IT or ITES) units under registration of Software Technology Parks of India (STPI) or any other designated Competent Authority and the Data Centres located anywhere in the State (hereinafter referred to as "the said Units").

And whereas, the Government of Maharashtra considers it necessary, in the public interest, to exempt, the consumption of energy in respect of the class of premises used by the said Units, from the payment of whole of the electricity duty payable under PART F of the Schedule appended to the said Act;

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 5A of the Maharashtra Electricity Duty Act (XL of 1958), the Government of Maharashtra hereby exempts the consumption of energy in respect of the class of premises used by the said Units mentioned in column (2) of the TABLE appended hereto, from the payment of whole of the electricity duty payable under PART F of the Schedule appended to the said Act, for the period mentioned against each of the said Units in column (3) of the said Table.

**Table**

| Sr. 1 | Premises Of Units 2 | Period 3 |
|---|---|---|
| 1 | New IT or ITES units registered with the Directorate of Industries shall be exempted from payment of electricity duty in public or private IT parks (including IT hardware and Telecom hardware manufacturing units), in A and B areas of the State classified as per the prevailing Package Scheme of incentives at the time of commencement of production or activity of the unit. | 10 years |
| 2 | New IT or ITES units satisfying the criteria referred to the entry 1 above and established under the said Policy in the State other than those parts shall be exempted from payment of electricity duty. | 15 years |
| 3 | The new IT or ITES units and Data Centers in IT SEZs, new IT or ITES units and Data Centers in IT parks in SEZs, and 100% exporting IT or ITES under registration of STPI or other designated competent authority shall be exempted from payment of electricity duty. | permanently |
| 4 | New Data Centers Units, registered with the Director of Industries as defined in Para 5E of the Maharashtra IT or ITES Policy-2015 and as per the provision of Para 3.4 (b) of the Government Resolution date 25th August 2015 established inside or outside the IT Park, in A and B areas of the State, classified as per the prevailing Package Scheme of incentives at the time of commencement of production or activity of the unit shall be exempted from payment of electricity duty. | 10 years |
| 5 | Data Centers as defined in Para 5 E of the Maharashtra IT or ITES Policy -2015 and as per the provision Para 3.4 (b) of Government Resolution dated the 25th August 2015 situated in other than those areas of the State referred to in entry 3 and 4 above shall be exempted from payment of electricity duty. | 15 years |

**Note :** (1) The exemption under this table shall commence with effect from the date when the unit specified in the said column (2) starts production or rendering the services.

(2) The electricity duty shall be exempted for IT parks developed by IT companies for their own use i.e. single units parks for the period mentioned above as per the location of the park.

(3) The exemption from payment of electricity duty shall be given to the projects mentioned in the notification only after producing registration certificate of Directorate of Industry or Software Technology Parks of India (STPI) or Competent Authority.

By order and in the name of the
Governor of Maharashtra,

(B.Y. Manta)
Deputy Secretary to Government